नि.दि.दा.क्र.०१/२०१३
कलावती वि. शांताबाई

## आदेश नि.क्र.४६

सदर अर्ज मूळ प्रतिवादीतर्फे प्रतिदाव्यामध्ये दुरूस्ती करिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे आहे.

२. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

४. अर्जातील कथन थोडक्यात असे की, प्रतिवादीने नि.क्र.१५ नुसार प्रतिदावा करून ताबा मिळणेची मागणी केलेली आहे. वादीने नि.क्र. ३६ नुसार वादपत्रात दुरूस्ती केली आहे. त्यामुळे प्रतिवादीस प्रतिदाव्यात ३ हेक्टर २२ आर ऐवजी ३ हेक्टर ८२ आर अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. टंकलेखनाच्या दोषामुळे चूक झालेली आहे. ती दुरूस्त करणे आवश्यक आहे. दुरूस्तीने दाव्याचे स्वरूपात बदल होणार नाही.

५. समोरील बाजूचे थोडक्यात कथन असे की, अर्ज बेकायदेशीर आहे. त्यामुळे रद्द होणेस पात्र आहे, शेवटी अर्ज रद्द करणेची व पर्यायी खर्चाचा आदेश करणेची विनंती केली.

६. वादीने वादमिळकतीचे वादग्रस्त क्षेत्रात दुरूस्ती केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिदाव्यामध्ये विनंती प्रमाणे दुरूस्तीस परवानगी देणे न्याय व आवश्यक आहे. दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपात बदल होत नाही. अर्ज सद्हेतूने केल्याचे दिसून येते, करिता खालील आदेश.

### आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. अर्जदाराने दुरूस्ती करून दुरूस्त प्रतिदाव्याच्या आवश्यक प्रती दाखल कराव्यात.

सही/—
(श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव

दि. १७/१२/२०१९